Agrowon, Dt. 28/06/2024

# सिंधुदुर्ग जिल्ह्यातून आंब्याची ४०० कोटींची उलाढाल

## जूनच्या दुसऱ्या आठवड्यात हंगाम आटोपला; ७० हजार टन उत्पादन

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



सिंधुदुर्गनगरी : जिल्ह्यातील आंबा हंगाम जूनच्या दुसऱ्या आठवड्यात संपला आहे. जिल्ह्यातून अंदाजे ७० हजार टन आंबा उत्पादन झाले आहे. तर साधारणपणे या वर्षीच्या हंगामात ४०० कोटींची उलाढाल झाली आहे.

जिल्ह्याती सर्वाधिक आंबा उत्पादन देवगड तालुक्यात घेतले जाते. येथील देवगड हापूस आंब्याला जगभरात पसंती आहे. याशिवाय वेंगुर्ले, मालवण तालुक्यात आंबा लागवड मोठ्या प्रमाणात आहे. याशिवाय सावंतवाडी, कुडाळ, दोडामार्ग, कणकवली आणि वैभववाडी तालुक्यांत देखील आंबा लागवड आहे. परंतु हे प्रमाण इतर तालुक्यांच्या तुलनेत कमी आहे. या वर्षीचा नियमित हंगाम मार्च अखेरपासून सुरू झाला. तत्पूर्वी नोव्हेंबरपासून अल्प प्रमाणात आंबा उत्पादन सुरू होते. येथील आंबा देशासह परदेशात देखील विक्रीसाठी जातो. अधिकतर आंबा वाशी मार्केटमध्ये जातो. अलीकडे थेट विक्रीचे प्रमाण देखील वाढले आहे. याशिवाय आंबा महोत्सवाच्या माध्यमातून देखील मोठ्या प्रमाणात आंबा विक्री झाली. या वर्षी ७० हजार टन आंबा जिल्ह्यातून उत्पादित झाला. यापैकी ४० हजार टन आंबा एकट्या देवगड तालुक्यात उत्पादित झाला. यातील हंगामाच्या अखेरीस उत्पादित झालेला दहा ते बारा टक्के आंबा कॅनिंगसाठी वापरण्यात आला.

या वर्षी सुरुवातीच्या हापूस आंब्याच्या प्रति पेटीला ४ ते ५ हजार रुपये दर मिळाला.

> **देवगड तालुक्यात कीड-रोग प्रादुर्भावामुळे आंबा बागायतदारांना उत्पादनखर्च अधिक आला. प्रति टनामागे १ हजार ते १२०० रुपये उत्पादनखर्च आला आहे. त्यामुळे उलाढाल जरी मोठी असली तरी हातात तुटपुंजीच रक्कम आली आहे.**
>
> **- विद्याधर जोशी,**
> आंबा बागायतदार, देवगड

त्यानंतर हंगामाच्या अखेरीपर्यंत आंब्याला प्रतिपेटी २ हजार ३०० ते ३ हजारांपर्यंत दर राहीला. पूर्ण हंगामात सरासरी २ ते २ हजार ५०० रुपये पेटीला मिळाला. संपूर्ण हंगामात जिल्ह्यातील आंब्याची उलाढाल साधारणपणे ४०० कोटींपर्यंत झाली आहे. कॅनिंग आंब्यामधून साधारणपणे २५ ते ३० कोटींपर्यंत उलाढाल झाली.

पुढारी
www.pudhari.com

# शेतकऱ्यांना दिलासा

किरकोळ महागाईचा दर हळूहळू कमी होत असला, तरी खाद्यवस्तूंच्या अस्थिर आणि वाढलेल्या किमती भाववाढ आटोक्यात आणण्यात बाधा निर्माण करत आहेत, असा इशारा रिझर्व्ह बँकेने दिला आहे. गेल्या आर्थिक वर्षात किरकोळ महागाईचा दर जो ५.४ टक्के होता, तो चालू आर्थिक वर्षात साडेचार टक्क्यांवर येईल, असा रिझर्व्ह बँकेचाच अंदाज आहे. शिवाय मोसमी पावसाचे वेळेआधी झालेले आगमन ही कृषी क्षेत्रासाठी समाधानकारक बाब ठरणार आहे. एकूण वातावरण अर्थव्यवस्थेसाठी पोषक आहे. आजही देशातील बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे केवळ शहरीजनांचा विचार करून चालणार नाही, तर ग्रामीण भारताच्या हिताचे निर्णय घ्यावे लागतील, हे लक्षात घेऊन रालोआ सरकारने २०२४-२५ च्या खरीप हंगामासाठी १४ पिकांच्या किमान आधारभूत किमतींत (एमएसपी) वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. कृषिखर्च आणि किंमत आयोगाच्या शिफारशी मान्य करून हा निर्णय योग्यवेळी घेण्यात आला. तांदळाच्या किमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत प्रतिक्विंटल ११७ रुपये, हायब्रीड ज्वारी १९१ रुपये, बाजरी १२५ रुपये, नाचणी ४४४ रुपये, मका १३५ अशा पद्धतीने, तर तूर ५५०, उडीद ४५० आणि मुगाच्या दरांत १२४ रुपयांनी वाढ झाली. भुईमूग, सूर्यफूल, सोयाबीन, तीळ तसेच कापसालाही वाढ लाभली. भारतात तांदळाचे पीक घेणारे शेतकरी मोठ्या संख्येने असून, त्याच्या आधार भावात वाढ झाली, ही चांगलीच बाब; मात्र सर्वात अधिक वाढ तेलबिया आणि डाळींसाठी झाली. त्यामुळे त्यांच्या उत्पादनास चालना मिळेल. आहारातील पोषण द्रव्यांच्या दृष्टीनेही डाळींचे महत्त्व आहेच. 'एमएसपी' ही उत्पादन खर्चाच्या किमान दीडपट असेल, असा निर्णय केंद्रीय अर्थसंकल्पातच २०१८ मध्ये जाहीर केला होता. तो लक्षात ठेवून कृषिमूल्य आयोगाने शिफारशी केल्या व त्यानुसार सरकारने हा निर्णय जाहीर केला. बाजरीच्या संदर्भात उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना सर्वाधिक, म्हणजे ७७ टक्के 'मार्जिन' मिळेल, तर तूर, ५९ टक्के, मका, ५४ टक्के आणि उडीद ५२ टक्के असा लाभ मिळेल. अन्य पिकेही किमान ५० टक्के लाभ शेतकऱ्यांच्या पदरात टाकतील, असा सरकारचा दावा आहे. आज भारतीय अन्न महामंडळाकडे तांदळाचा ५ कोटी ३४ लाख टन इतका साठा आहे. बफर स्टॉकमध्ये जेवढा तांदूळ असण्याची गरज आहे, त्याच्या चौपटीने हा साठा आहे; मात्र या सर्वात दुसरी बाजूही विचारात घेतली पाहिजे. आधारभूत किंमत वाढवताना शेतकऱ्याच्या उत्पादन खर्चात कशी कपात होईल, याचाही विचार प्राधान्याने झाला पाहिजे. वाढता उत्पादन खर्च हा शेतकऱ्याच्या दु:स्थितीचे एक महत्त्वाचे कारण आहे. गहू आणि तांदळाची सरकार 'एमएसपी'द्वारे सर्वाधिक खरेदी करते. शेतकऱ्याने डाळीचे पीक घेतले, तरी अनेकदा ग्राहकांचा विचार करून डाळींची आयात केल्यामुळे भाव पडले व शेतकऱ्यांचा तोटा झाला, असे अनेकदा घडते. आज शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तू आणि आदानांवरील (इनपुटस्) जीएसटी २८ टक्के इतका आहे. तो घटवण्याची सार्वत्रिक मागणी आहे. तसेच केंद्र सरकारने बाजारपेठेतील हस्तक्षेप कमी केला, तरीही शेतकऱ्यांचे भले होईल. शहरी मध्यमवर्गीयांना भाववाढीचा फटका बसू नये, याचा विचार करताना कोट्यवधी शेतकऱ्यांच्या हलाखीचे काय, याची अधिक चिंता सरकारने केली पाहिजे. मागच्या वर्षी अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग ८.२ टक्के होता, तर कृषी विकासदर केवळ १.४ टक्का, हीसुद्धा गंभीर बाब आहे. सरकार गहू, ज्वारी, बाजरी, मका, मूग, शेंगदाणा, सोयाबीन, तीळ, कापूस अशा २३ शेतीमालांची खरेदी हमीभावाने म्हणजेच ठरावीक किमतीत करत असते. याचा अर्थ, शेतमालाच्या खरेदीचे दर सरकार जाहीर करते आणि सरकारी खरेदी केंद्रांवर त्यांची खरेदी केली जाते. बाजारात शेतमालाचे भाव घटले, तरीही सरकारने ठरवलेल्या हमीभावानेच माल घ्यायचा आणि शेतकऱ्यांचे नुकसान टाळायचे, असे हे धोरण आहे.

शेतमालाचा संपूर्ण देशातला हमीभाव एकसमान असतो. ज्या उत्पादन खर्चावर हा हमीभाव मिळणार, तो मोजताना सरकारकडून सर्व प्रकारचा खर्च विचारात घेतलेला नाही, अशी शेतकऱ्यांची भावना आहे. शिवाय खरेदी केंद्रे सुरूच न करणे, दलालांच्या हातात शेतमाल कवडीमोलाने जाईल, यासाठी सरकारी यंत्रणांचे बेभरवशाचे धोरण अशा कारणांमुळे ही योजनाही अनेकदा कुचकामी ठरताना दिसते. मराठवाड्यातील कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना याचा फटका दरवर्षी बसताना दिसतो. २०१६-१७ पासून देशात सातत्याने धान्योत्पादनात वाढ होत आहे; परंतु एकीकडे 'मेरे देश की धरती सोना उगले उगले हीरेमोती' असे चित्र असताना, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होत आहेत? शेतकरी रोजगारासाठी शहरांकडे धाव का घेत आहे? एकेकाळी शरद जोशी यांनी शेतीमालाला रास्त भाव द्यावेत, अशी मागणी करून रान पेटवले, तरीही याबाबतची परिस्थिती बदललेली नाही. केवळ ६ टक्के शेतकऱ्यांना हमीभावांचा फायदा मिळतो, असे म्हटले जाते. प्रत्यक्षात तांदूळ व गव्हाबाबत तरी अनुक्रमे १३ व १६ टक्के शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला आहे. भाताच्या हमीभावाचा फायदा तर छत्तीसगडमध्ये ३८ टक्क्यांना झाला; मात्र बिहार, तामिळनाडू व पश्चिम बंगालात केवळ एक टक्क्यांनाच त्याचा फायदा झाला. याचा अर्थ, राज्याराज्यांतील हमीभावांबाबतची परिस्थिती वेगवेगळी आहे. तसेच हमीभावांचा केवळ बड्या शेतकऱ्यांनाच फायदा होतो, हा प्रचारही खोटा असल्याचे कृषी संशोधक दाखवून देत आहेत. कापूस, सोयाबीन व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव न मिळणे तसेच निर्यातबंदी वगैरे चुकीच्या धोरणांमुळे यंदाच्या लोकसभा निवडणुकीत फटका बसला. आता हरियाणा व महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका तोंडावर आहेत. केंद्रीय कृषिमंत्रिपदाची सूत्रे शिवराजसिंह चौहान यांनी हाती घेतली असून, मध्य प्रदेशात त्यांनी कृषी क्षेत्रात चांगले काम केले आहे. शेतीला पोषक धोरणे राबवून शेतकऱ्यांच्या प्रश्नांची तीव्रता कमी करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

Punyanagari, Dt. 21/06/2024

# ‘एफपीओं’च्या राष्ट्रीय धोरणाचा मसुदा जाहीर

## केंद्र सरकारने देशभरातून मागविल्या सूचना

अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : शेतकरी उत्पादक संस्थांच्या (एफपीओ) राष्ट्रीय धोरणाचा मसुदा केंद्र शासनाने जाहीर केला आहे. या मसुद्यावर देशभरातील संस्था व शेतकऱ्यांची मते मागविण्यात आली आहेत.

देशात दहा हजार नव्या ‘एफपीओ’ स्थापन करण्यासाठी राष्ट्रीय धोरण आणले जाईल, अशी घोषणा २०१९-२० च्या केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यानंतर केंद्रीय कृषी मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव फईज एफ. ए. किदवई यांच्या अध्यक्षतेखाली एक तज्ज्ञ गट स्थापन केला गेला. या गटाने तयार केलेला मसुदा आता केंद्रीय कृषी पणन उपसल्लागार डॉ. एस. के. सिंग यांनी मंगळवारी (ता. १८) जाहीर केला. मसुद्यावरील मते व सूचना surendrak.singh@nic.in या ई-मेलवर पाठविण्यासाठी १४ दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे.

‘एफपीओ’ राष्ट्रीय धोरणाच्या मसुद्यानुसार आता देशातील ७ हजार २५६ गटांमध्ये पुढील पाच वर्षांत प्रत्येकी सात ते आठ ‘एफपीओ’ स्थापन करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. प्रत्येक ‘एफपीओ’मध्ये सरासरी ५०० शेतकऱ्यांचा समावेश गृहीत धरीत देशातील ६.४८ लाख गावांमधील अंदाजे अडीच कोटी शेतकऱ्यांना या धोरणाचा थेट लाभ मिळवून देण्याचे निश्चित केले गेले आहे. ‘एफपीओं’च्या माध्यमातून शेतीमालाचे उत्पादनपूर्व व उत्पादन कालावधीतील तंत्र तसेच काढणी पश्चात तंत्रज्ञानात बदल, पारंपरिक कृषी पद्धतीत बदल, कृषी उदमशीलता वृद्धी, शाश्वत विकासावर आधारलेली कृषी उद्योग व्यवस्थेची बांधणी असे उद्दिष्ट राष्ट्रीय धोरणात नमूद केले आहे. त्यासाठी तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण बाबींचा अवलंब आणि शेतीमाल खरेदी-विक्रीच्या करारासंबंधी सुधारणा अपेक्षित धरण्यात आल्या आहेत. केंद्राने ‘एफपीओं’च्या मध्यवर्ती समन्वयक यंत्रणेला पूरक ठरणारी मदत यंत्रणा म्हणून राष्ट्रीय व्यावसायिक यंत्रणा (सीपीए) उभारण्याचे निश्चित केले आहे. या दोन्ही यंत्रणा ‘एफपीओं’साठी एक खिडकी प्रणाली विकसित करणार आहेत. कृषी व ग्रामीण भागाच्या विकासाला मदत ठरणारी ‘एफपीओं’ची बळकट मूल्यसाखळी उभारण्याचे राष्ट्रीय धोरणात नमूद केले गेले आहे. देशातील सर्व ‘एफपीओं’चा विकास अमूल मॉडिलने केला जाणार आहे. त्यासाठी क्षेत्रीय संस्था, जिल्हा संघ आणि राज्य संघ अशी अमूलची त्रिस्तरीय रचना स्वीकारण्यात आली आहे. या रचनेला पूरक ठरणारे राज्यस्तरीय धोरण जाहीर करण्याची मुभा राज्यांना देण्यात आली आहे.

### ‘एफपीओं’साठी होणाऱ्या धोरणात्मक सुधारणा

- केंद्रीय कृषी मंत्रालयात मध्यवर्ती समन्वय विभाग तयार होणार. त्यासाठी सहसचिव दर्जाचा अधिकारी नियुक्त केला जाणार
- जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती कार्यरत होणार
- कमी व्याजदरात कर्जपुरवठा
- आधारभूत धान्य खरेदी व्यवस्थेत प्राधान्य
- एफपीओ धोरणाच्या समन्वयासाठी केंद्रीय विपणन विभागाच्या अतिरिक्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती समिती कार्यान्वित होणार
- प्रत्येक राज्यात समन्वय यंत्रणा स्थापन होणार
- भांडवल पुरवठ्यासाठी इक्विटी ग्रँट फंड व स्थापना निधी (फॉर्मेशन फंड) उभारले जाणार
- केंद्र व राज्यांच्या योजनांमध्ये ‘एफपीओं’ना सवलती, प्राधान्य मिळणार
- ‘एफपीओं’साठी उच्चशिक्षित ‘सीईओ’ अथवा व्यवस्थापक पुरवणारी यंत्रणा तयार होणार
- देशातील सर्व ‘एफपीओं’चे व्यवहार व कामकाज जलद करण्यासाठी ‘एफपीओ ई-रजिस्ट्री’ नावाने संगणकीय प्रणाली विकसित होणार

# ई-नाम व शेतमाल तारण योजनेची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे-पुरी

**नाशिक :-** ई-नाम व शेतमाल तारण योजना या शेतकऱ्यांच्या हिताच्या व फायद्याच्या आहेत म्हणून त्या योजनांची माहिती शेतकरी बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे काम व्हायला हवे आणि शासन व शेतकरी यांचेतील केंद्रबिंदु म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीकडे पाहिले जाते म्हणून बाजार समित्यांनी देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून शासनाच्या विविध योजनांचा फायदा घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाचे सरव्यवस्थापक पुरी यांनी नाशिक येथे आयोजित नाशिक व जळगांव जिल्ह्यातील बाजार समित्यांच्या सचिवांच्या आढावा बैठकीत केले आणि शेतकरी बांधवांना बाजार समित्या शेतमाल विक्रीचे विश्वासाचे ठिकाण आहे असे वाटावे यासाठी देखील सचिवांनी जाणिवपुर्वक प्रयत्न करण्याची सुचना देखील पुरी यांनी केली.सर्व बाजार समित्यांनी त्यांच्याकडे थकीत असलेले कर्ज व अंशदान रक्कम लवकरात लवकर भरण्याचे आणि शासकीय कामात कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.



शेतकरी बांधवांना आपल्या शेतमालाला भाव मिळवून देणारी हक्काची बाजारपेठ म्हणजे कृषी उत्पन्न बाजार समिती,शेतकरी बांधवांचा आजही बाजार समितीवर विश्वास आहे,तो आपण टिकवून ठेवला पाहिजे व त्यासाठी सचिवांनी सतत प्रयत्नशील असायला हवे असे चाळीसगांव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव जगदीश लोधे यांनी सचिवांच्या बैठकीत बोलतांना सांगितले.

बैठक यशस्वीपणे पार पाडण्याकामी विभागीय व्यवस्थापक सी.बी.देशमुख, टापसे,पाटोळे,अत्तरदे यांच्यासह नाशिक विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. बैठकीत सन २०२३-२४ चे उत्पन्नावरील अंशदान आकारणी,बाजार समिती कडील थकीत कर्ज व अंशदान रक्कम भरणे,ई-नाम व शेतमाल तारण योजनेची अंमलबजावणी करणे, आरकेव्हीय योजना,कृषी पणन मित्र वार्षिक वर्गणीदार वाढविणे, ऑनलाईन प्रणालीत दैनंदिन आवक व बाजारभाव नियमित अपलोड करणे यासह इतर महत्वाच्या विषयांचा आढावा घेण्यात आला.

Punyanagari, Dt. 18/06/2024

# शेतमालाच्या विक्री व्यवस्थेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

**भारत देश हा कृषिप्रधान देश आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण भागात शेतकरी त्यांनी उत्पादित केलेला शेतमाल घरी खाण्यासाठी वापरत असत. शिल्लक शेतमाल इतर लोकांना देऊन, त्यांच्याकडून आपणास आवश्यक असलेला शेतमाल घेत असत. नंतरच्या काळात शेतकरी उत्पादित केलेला शेतमाल जवळच्या बाजारपेठांमध्ये आणून विक्री करू लागला. तेथे त्यांना खरेदीदार सांगेल त्या किमतीमध्ये आपल्या शेतमालाची विक्री करावी लागत असे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळत नसे.**



सन १८८६ मध्ये अकोला जिल्ह्यातील कारंजा लाड येथे देशातील पहिल्या बाजार समितीची स्थापना करण्यात आली. सन १८९७ मध्ये बेरर कापूस व धान्य पणन कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर सन १९२७ मध्ये मुंबई कापूस पणन कायदा अस्तित्वात आला. केंद्र शासनाच्या अखत्यारित सन १९३५ मध्ये डायरेक्ट मार्केटिंग आणि इन्स्पेक्शनची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर पंचायतराज व्यवस्था अंमलात आली. पंचवार्षिक योजना कार्यान्वित झाली. बाजार समित्यांच्या नियंत्रणासाठी महाराष्ट्र कृषी उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३ हा कायदा अस्तित्वात आला. कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल विक्री करता येईल व शेतकऱ्यांच्या शेतमालास चांगला दर मिळेल, हे अपेक्षित होते. बाजार समितीमध्ये खरेदीदारांची संख्या वाढल्याने स्पर्धा निर्माण झाली व शेतमाल उत्पादक शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्यास मदत झाली. शेतमालाच्या विक्रीमुळे बाजार समित्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली व त्यामुळे काही प्रमाणात पायाभूत सुविधा बाजार आवारामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या. राज्यात ३०५ मुख्य बाजार व ६२४ उपबाजार आहेत. राज्यातील १०८ बाजार समित्यांमध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रत्येकी १००० मे. टन क्षमतेची गोदामे उभारणीचे काम कार्यान्वित करण्यात आलेले असून, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घेता येईल. तसेच, राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत ३१ बाजार समित्यांमध्ये व ई-नाम अंतर्गत २७ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी यंत्र बसविण्यात आलेले असल्याने, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाचे मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्यास मदत होत आहे.

कालांतराने केंद्र शासन देशात खरीप व रब्बी हंगामात उत्पादित होणाऱ्या २१ प्रकारच्या शेतमालाच्या किमान आधारभूत किमती दर वर्षी जाहीर करू लागली. उत्पादित होणाऱ्या शेतमालाची राज्यात किमान आधारभूत किमतीने शासनाने खरेदी केंद्रांच्या माध्यमातून खरेदी सुरू केली. शेतकऱ्यांना त्यांनी उत्पादित केलेला शेतमाल बाजार समिती आवारात आणून विक्री करणे बंधनकारक असल्याने, बाजार समित्यांची मक्तेदारी झाली असल्याचे शेतकऱ्यांचे मत तयार झाले. सन २००३ मध्ये पणन कायद्यामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या. यामध्ये मार्केट यार्ड उभारणीसाठी खासगी गुंतवणूकदार आकर्षित करणे, शीतगृह व गोदामांची उभारणी, लॉजिस्टिक सुविधांचा समावेश व काढणीपश्चात मूल्यसाखळी विकसित करणे इ. मुद्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले होते. शेतमालाच्या विक्रीमधील मध्यस्थांची संख्या कमी करून उत्पादक ते ग्राहक थेट विक्री होण्याच्या उद्देशाने आंध्र प्रदेशात रायतू बाजार, पंजाबमध्ये अपनी मंडी, तमिळनाडूमध्ये उजवर संथाई व महाराष्ट्रात शेतकरी आठवडे बाजार यांसारखे उपक्रम सुरू करण्यात आले. सन २०१७ मध्ये केंद्र शासनाने पणन कायद्यात आमूलाग्र बदल केले. राज्यात खासगी बाजार उभारणी करण्यास मान्यता दिली आहे.

बाजारपेठेत शेतमालाच्या आवकेत वाढ झाल्यामुळे शेतमालाचे दर कमी होतात. कालांतराने शेतमालाचे दर वाढल्यानंतर व्यापारी त्याची विक्री करतात, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. उत्पादित होणाऱ्या फळे व भाजीपाल्यास निर्यातीला चालना देण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने राज्यात ४४ विविध ठिकाणी निर्यात सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. राज्यात शितगृहे, प्रशितकरण, रायपनिंग चेंबर्सची उभारणी करण्यात आलेली आहे. यामुळे उत्पादित होणारा फळे व भाजीपाला निर्यात होण्यास मदत झालेली आहे. नवी मुंबई, वाशी येथे व्हेपरहीट ट्रिटमेंट प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली असून सदर ठिकाणाहून युरोप, जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, रशिया व मॉरिशस इ. देशांमध्ये आंब्याची निर्यात झालेली आहे. विकिरण सुविधा केंद्र, वाशी मुंबई येथून अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशांना आंब्याची निर्यात झाली. राज्यातील वैयक्तिक शेतकरी, सहकारी संस्था, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्या या स्वतः निर्यातदार झाल्या पाहिजेत, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाच दिवसांचा हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स सुरू केलेला आहे.

राज्यातील विविध २६ शेतमालास भौगोलिक मानांकन प्राप्त झालेले आहेत. भौगोलिक मानांकनामुळे राज्यातील समाविष्ट असलेल्या शेतमालास जगभरात व देशात एक वेगळी ओळख निर्माण झाल्यामुळे बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत झालेली आहे. शेतमालाच्या बाजार व्यवस्थेमध्ये ई-कॉमर्सचा वापर वाढावा म्हणून, सन २०१६ मध्ये केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषिबाजार (ई-नाम) योजना कार्यान्वित केली. सद्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे असून, राज्याच्या कृषिपणन व्यवस्थेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झालेला आहे. सद्यःस्थितीत राज्यातील सर्व बाजार समित्या इंटरनेटद्वारे जोडण्यात आलेल्या आहेत. कोरोना महामारीनंतर शेतमालाच्या पणन व्यवस्थेत खूप मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत. राज्यातील मोठ्या शहरांमध्ये उत्पादक ते ग्राहक थेट विक्री अंतर्गत शेतकरी आत्ता फोन पे, गुगल पे, भिम अॅप, पेटियम, नेटबँकींग, क्रेडिट व डेबिट कार्ड यासारख्या ऑनलाईन पेमेंट सुविधांचा वापर शेतकरी करीत आहेत. शेतकऱ्यांनीसुद्धा क्यूआर कोडसारख्या तंत्रज्ञानाचा शेतमालाच्या विक्रीमध्ये वापर सुरू केलेला आहे. क्यूआर कोडच्या वापरामुळे ग्राहकांना शेतमालाच्या गुणवत्तेची हमी मिळत आहे, तर उत्पादक शेतकऱ्यांनासुद्धा जास्तीचा दर मिळण्यास मदत होत आहे. आजमितीस राज्यात हापूस आंबा, केशर आंबा, केळी व स्ट्रॉबेरी यांसारख्या फळपिकांमध्ये क्यूआर कोडचा वापर शेतकऱ्यांनी सुरू केलेला आहे. यामुळे ग्राहक व उत्पादक हे थेट संपर्कात आलेले आहेत.

**- डॉ. सुभाष एस. घुले**
**उपसरव्यवस्थापक,**
**महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,**
**कोल्हापूर विभाग**

Agrowon, Dt. 18/06/2024

# आखाती देशांत सहाशे टन केळीची निर्यात

## नांदेड जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपनीचा पुढाकार; प्रति क्विंटल १४०० ते १५०० रुपये दर

**कृष्णा जोमेगावकर : ॲग्रोवन वृत्तसेवा**

नांदेड : जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या अर्धापूर तालुक्यातील केळीची निर्यात आखाती देशात होत आहे. बारड येथील शीतलादेवी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या माध्यमातून गेल्या ३० दिवसांत इराण, इराक, अफगाणिस्तान, ओमान, दुबईसह इतर देशांत ६०० टन केळीची निर्यात केली आहे. सध्या देशासह -विदेशात केळीला मागणी वाढल्याने १४०० ते १५०० रुपये क्विंटल दर मिळत असल्याचे कंपनीचे संचालक नीलेश देशमुख यांनी सांगितले.

कोरोना लॉकडाउननंतर सध्या केळीची निर्यात होत असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत आहे. अन्यथा अनेकवेळा अत्यल्प दरामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघणे अवघड होऊन बसते. परंतु सध्या संकटात सापडलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना दिलासादायक चित्र निर्माण झाले आहे. जिल्ह्यातून देशातील प्रमुख शहरात व इराणसह अनेक देशांत केळीच्या निर्यातीला सुरुवात झाली आहे. आठशे ते हजार रुपये प्रति क्विंटलवर असलेला दर आता १४०० ते १५०० पर्यंत गेल्यामुळे शेतकऱ्यांमधूनही समाधान व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील अर्धापूर परिसरात पिकणारी केळी ही खाण्यासाठी चविष्ट व टिकाऊ असल्यामुळे मोठी मागणी असते. चांगले पर्जन्यमान आणि इसापूर-येलदरी धरणांत पाणीसाठा उपलब्ध असल्यामुळे केळीची लागवड झाली होती. नांदेड जिल्ह्यातून महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक, दिल्ली, पंजाब, हरियाना या राज्यांत केळी पाठविणे सुरू आहे.

दर्जेदार केळीची निवड करून बांधावरच मागणीप्रमाणे पॅकिंग करून गाडी भरण्यात येत आहे. तसेच जहाजांच्या माध्यमातून इराणसह विविध देशांत निर्यात होत आहे. गेल्या ३० दिवसांत इराण, इराक, अफगाणिस्तान, ओमान, दुबईसह इतर देशांत ६०० टन केळी निर्यात केली आहे. केळींची मागणी वाढल्यास दरातही चांगली सुधारणा होईल, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. सध्या व्यापाऱ्यांचा कल अर्धापूर परिसरात केळीकडे वाढला आहे. गत काही दिवसांत मागणी वाढल्याने केळीच्या दरात बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे.

### दरवाढी शेतकऱ्यांसाठी आश्वासक

एप्रिल व मे महिन्यांच्या पहिल्या आठवड्यात केळीला दोन हजार रुपये क्विंटल भाव होता. मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बाराशे रुपये दर मिळाला. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सहाशे रुपये आणि जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाचशे रुपये दर मिळू लागला. यामुळे केळी उत्पादक शेतकरी हवालदिल झाले होते. केळीला दर मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी केळीकडे दुर्लक्ष केले होते. तसेच उन्हाची तीव्रता वाढल्याने केळी वाळू लागली. अशावेळी केळीच्या दरात आश्वासक वाढ होत असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत.



नांदेड : दर्जेदार केळीची निवड करून मागणीप्रमाणे पॅकिंग करून निर्यातीसाठी पाठविली जात आहे.

Agrowon Dt. 14/06/2024

# यूएसए, ऑस्ट्रेलियाला हजार टन आंबा निर्यात



**लासलगाव, जि. नाशिक** : जिल्ह्यातील लासलगाव येथे भाभा अणू संशोधन केंद्राच्या कृषक केंद्रातून आंब्यावर विकिरण प्रक्रिया होऊन १ एप्रिलपासून आंबा निर्यातीला सुरुवात झाली आहे. रविवार (ता.९) अखेर एक हजार टन आंबा यूएसए आणि ऑस्ट्रेलिया येथे निर्यात झाल्याची माहिती लासलगाव 'कृषक'चे अधिकारी संजय आहेर यांनी दिली.

कोकण हापूस आंब्याची परदेशवारीही यंदाही लासलगाव मार्गे झाली असून ९ जूनपर्यंत एक हजार टन आंबे प्रक्रिया करून निर्यात झाले आहे. भारतातील आंब्यांना परदेशात मोठी मागणी असते. भारतात आंब्याचे उत्पादन घेतले जाते व चवीला उत्कृष्ट असल्याने भारतीय आंब्यांना जगभरात पसंत केले जाते. मागील वर्षी एक हजार २३ टन आंब्याची यशस्वी निर्यात लासलगाव येथील कृषकमधून झाली होती. पंधरा वर्षांपासून अमेरिकेने ठरवून दिलेल्या मापदंडाचे काटेकोर पालन होत असल्याने हापूस आंब्याची अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका आणि मलेशिया दिशेने कूच करू लागला आहेत.

| वर्ष | निर्यात (टन) |
|---|---|
| २०१८ | ५८० |
| २०१९ | ६८५ |
| २०२२ | ३५० |
| २०२३ | १०२३ |
| २०२४ (९ जून अखेर) | १००० |

Agrowon, Dt. 14/06/2024

# ‘केसर क्रांती’चा समुद्रमार्ग

**राज्यात केसर आंब्याचे क्षेत्र तसेच घन, अतिघन लागवड पद्धतीने उत्पादन वाढत असताना देश-विदेशातील नवनव्या बाजारपेठा शोधाव्याच लागणार आहेत.**

आज दोन वर्षांपूर्वी (२०२२ मध्ये) भारतातून पहिल्यांदा समुद्रमार्गे आंब्याची निर्यात अमेरिकेला झाली होती. बीएआरसी (भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर), पणन मंडळ, अपेडा, आंबा उत्पादक तसेच खासगी निर्यातदार यांच्या प्रयत्नातून हे शक्य झाले होते. त्यावेळी आंबा निर्यातीमधील ही ऐतिहासिक कामगिरी असून हा बदल क्रांतिकारक ठरणारा आहे, असा विश्वास ॲग्रोवनने व्यक्त केला होता. तो आता सार्थ ठरताना दिसतो. कारण समुद्रमार्गे अमेरिकेपाठोपाठ आता जपानला केसर आंब्याची निर्यात नुकतीच करण्यात आली आहे. या पूर्वी १९९७-९८ ला देखील समुद्रमार्गे लंडन तसेच अमेरिकेला आंबा निर्यातीचे प्रयोग करण्यात आले होते. परंतु नंतर त्यात आपल्याला सातत्य ठेवता आले नाही. संपूर्ण जगच आता आरोग्याच्याबाबतीत जागरूक झाले आहे. त्यामुळे बहुतांश देशांचे निर्यातीचे मापदंड किचकट झाले आहेत. जपान ही फळे-भाजीपाल्यासाठी त्यातल्या त्यात अतिसंवेदनशील बाजारपेठ मानली जाते. या देशाचे निर्यातीचे मापदंड तर अजूनच क्लिष्ट आहेत. परंतु या सर्वांची पूर्तता करीत साडे सात टन केसर आंबा जपानला समुद्रमार्गे पाठविण्यात उत्पादक शेतकरी, पणन मंडळासह निर्यातीसंबंधातील इतर घटकांना यश आले आहे. समुद्रमार्गे होत असलेली निर्यात ही स्वस्त पडत असली तरी याला खूप वेळ लागतो. या दरम्यान आंबा टिकवायचा कसा, हा खरा पेच सर्वांसमोर होता. परंतु काढणीनंतरच्या विविध प्रक्रियांद्वारे केसर आंब्याची टिकवण क्षमता ४५ दिवस वाढविण्यात यश आल्याने समुद्रमार्गे निर्यातीचा मार्ग सुकर झाला आहे. हवाईमार्गाच्या तुलनेत समुद्रमार्गे आंबा निर्यातीला निम्म्याहून कमी खर्च येतो. त्यामुळे उत्पादक, निर्यातदार आणि ग्राहक अशा सर्वांना ही निर्यात किफायतशीर ठरते.

हापूसबरोबर देश-विदेशातील ग्राहकांच्या पसंतीस उतरलेला आंबा म्हणजे केसर. केसरच्या गोडव्याने लहान मुलांपासून ते वयोवृद्धांना भुरळ घातली आहे. सर्वसाधारणपणे हापूसनंतर केसर बाजारात दाखल होत असल्याने याला दरही चांगला मिळतोय. परंतु बदलत्या हवामानाचा फटका केसरलाही बसत आहे. मागील पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा अशा तिन्ही हंगामातील प्रतिकूल परिस्थितीचा विपरीत परिणाम केसर आंब्यावर झाला. केसरला ऑक्टोबर ते फेब्रुवारीपर्यंत मोहोर येत राहिला. त्यामुळे हंगामाची सुरुवात एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून झाली ती आता शेवटपर्यंत संथगतीने सुरूच आहे. चालू हंगामात केसर आंब्याचे उत्पादन सरासरी १० टक्क्यांनी घटले आहे. दर मात्र गेल्यावर्षीच्या तुलनेत चांगले मिळताहेत. राज्यात एकीकडे केसर आंब्याचे क्षेत्र वाढत आहे. घन, सघन पद्धतीने लागवड आणि बागेचे काटेकोर व्यवस्थापन याद्वारे केसरचे उत्पादन वाढत आहे. अशावेळी देशांतर्गत तसेच विदेशातील नवनव्या बाजारपेठा आपल्याला शोधाव्याच लागणार आहेत. तसे पाहिले तर निर्यातीच्या बाबतीत आत्तापर्यंत केसर थोडा दुर्लक्षितच म्हणावा लागेल. परंतु आता जगभरातून केसरला मागणी होत असताना निर्यातवृद्धीसाठी आणि त्यात सातत्य टिकवून ठेवण्यासाठी आपल्याला प्रयत्न वाढवावेच लागणार आहेत. त्यात आता समुद्रमार्गे निर्यातीचा पर्याय पुढे आल्याने अमेरिका, जपानसह इतर कोणकोणत्या देशांत आपण केसर आंबा पाठवू शकतो, हे पणन तसेच विदेश व्यापार-वाणिज्य मंत्रालयाने पाहावे. अपेडाने आंबा निर्यात होऊ शकणाऱ्या देशांच्या बदलत्या मापदंडाबाबत उत्पादक शेतकऱ्यांमध्ये प्रबोधन वाढवायला पाहिजेत. कृषी-फलोत्पादन विभागाने विविध देशांच्या मापदंडाप्रमाणे निर्यातक्षम केसर आंब्याचे उत्पादन कसे घ्यायचे, आंबा रसायन तसेच कीड-रोगअंशमुक्त कसा राहील, याबाबत उत्पादकांना मार्गदर्शन करायला हवे. वैयक्तिक आंबा उत्पादक तसेच शेतकऱ्यांच्या कंपन्या यांनी मध्यस्थांशिवाय स्वतः थेट आंबा निर्यात केली तर त्यांना ती अधिक किफायतशीर ठरणार आहे. त्यामुळे यासाठी उत्पादकांसह त्यांच्या कंपन्यांनी प्रयत्न वाढवायला हवेत.

Agrowon Dt. 13/06/2024

# समुद्रमार्गे जपानला पहिल्यांदाच केसर आंबा निर्यात

## पणन मंडळाच्या प्रयत्नांना यश; ४५ दिवसांनी वाढली टिकवण क्षमता

**गणेश कोरे** : ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : केसर आंब्याला जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी नवनवीन विकसित देशांमध्ये निर्यात खुली व्हावी यासाठी पणन मंडळाच्या गेल्या अनेक वर्षांपासूनच्या प्रयत्नांना यश आले आहे. समुद्रमार्गे कमी वाहतूक खर्चात जपानला पहिल्यांदाच केसर आंबा निर्यात करण्यात आला आहे. सोमवारी (ता. १०) साडेसात टन आंबा जपानला पाठविण्यात आल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी 'ॲग्रोवन'ला दिली.

या बाबत कदम म्हणाले, "विविध शेतीमालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळावी यासाठी पणन मंडळाचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात. यासाठी मंडळाने राज्याच्या विविध भागात शेतीमालनिहाय निर्यात सुविधा केंद्रे उभारली आहेत. सध्या आंबा निर्यातीचा हंगाम सुरू असून, पणन मंडळाकडून अमेरिका, युरोपसह विविध देशांसह जपानला विमानाने यापूर्वी आंबा निर्यात केला आहे. मात्र जपानला समुद्रमार्गे आंबा निर्यातीचे



प्रयत्न सुरू होते. जपान ही अतिशय संवेदनशील बाजारपेठ असून, निर्यातीसाठी विविध मापदंड आहेत. ते इतर देशांच्या तुलनेने अतिशय किचकट आहेत. यासाठीचे निर्यातीसाठीच्या करावयाच्या उपचार आणि प्रक्रियेचे मापदंड तयार करण्यात आले होते. यासाठी प्रयोग करण्यात आले होते. या प्रयोगाअंती आंब्याची टिकवण क्षमता आणि दर्जा ४५ दिवसांनी वाढली होती. या सर्व प्रयोगांचा विचार करून, अखेर साडेसात टन आंबा बेरीडेल फूड्सद्वारे जपानला समुद्रमार्गे पाठविण्यात आला."

### समुद्रमार्गे दर ५५० रुपयांनी कमी

समुद्रमार्गे आंब्याला प्रति किलोला ५५० रुपये दर विमान वाहतुकीपेक्षा कमी होत असल्याने निर्यातदारांना ही सेवा परवडते आणि जपानच्या बाजारपेठेत तुनलेनेने कमी दराने उपलब्ध होत असल्याने ग्राहकदेखील चांगले उपलब्ध होतात. असा निर्यातदारांचा अनुभव आहे. असे निर्यात विभागाचे उपसरव्यवस्थापक सतीश वराडे यांनी सांगितले.

### ...यांचे मिळाले सहकार्य

आंब्याच्या विविध प्रक्रिया आणि मापदंड निश्चित करण्यासाठी 'अपेडा'चे अध्यक्ष अभिषेक देव, सचिव डॉ. सुधांशू, सरव्यवस्थापक प्रशांत वाघमारे, सेंटर इन्स्टिट्यूट फॉर सबट्रॉपिकल हॉर्टिकल्चर डॉ. टी. दामोदर आणि बेरीडेल फूड्सचे संचालक सर्वानन आचारी यांचे सहकार्य लाभल्याचे संजय कदम यांनी सांगितले.

> **जपानसारख्या फळे भाजीपाल्यांच्या अतिसंवेदनशील बाजारपेठेत भारतातून समुद्रमार्गे केसर आंबा निर्यात होणे ही अतिशय आनंदाची आणि अभिमानास्पद घटना आहे. समुद्रमार्ग निर्यातीसाठीचे आंब्यावरील उपचार आणि प्रक्रियेसाठीचे विविध मापदंड करण्यासाठी विविध संस्थांच्या अधिकाऱ्यांचे हे यश आहे. यामुळे केसर उत्पादक शेतकऱ्यांसह विविध फळांच्या निर्यातीसाठी हे मापदंड वापरण्यासाठी आत्मविश्वास वाढला आहे.**
>
> – **संजय कदम**, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

### आंब्यावर केली प्रक्रिया...

- सोडिअम हायपोक्लोराइडची ५१ अंश सेल्सिअसची ३ मिनिटांची उष्णजल प्रक्रिया.
- यानंतर ४७.५ अंश सेल्सिअसची व्हेपर हीट ट्रिटमेंट.
- लखनऊच्या सेंटर इन्स्टिट्यूट फॉर सबट्रॉपिकल हॉर्टिकल्चर संस्थेद्वारे ऑरगॅनिक मेट वॉश प्रक्रिया.
- या आंब्यावर शीतकरण प्रक्रिया करण्यात आली.

Samana, Dt. 12/06/2024



# एक हजार टन आंबा निर्यात

नाशिक : जिल्ह्यातील लासलगाव येथील भाभा अणू संशोधन केंद्रीय कृषिक केंद्रातून एक हजार टन आंबा अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाला निर्यात करण्यात आला आहे. कोकणच्या हापूस आंब्याची परदेशवारीही यंदा लासलगावमार्गे करण्यात आली. आंब्यावर प्रक्रिया करण्यात आल्यानंतर हा आंबा निर्यात करण्यात आला. मागील वर्षी एक हजार २३ टन आंब्यांची निर्यात करण्यात आली होती. लासलगाव येथील भाभा अणू संशोधन केंद्रातून अल्फान्सो, केशर, बदाम, राजापूर, मल्लिका, हिमायत, हापूस आंब्याच्या जाती निर्यात करण्यात आल्या आहेत.

पुण्य नगरी

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात १५ कोटींची उलाढाल

**पुणे** : कोकणातील हापूस आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचा ग्राहक मिळावा आणि ग्राहकांना कोकणातील अस्सल हापूस उपलब्ध व्हावा, या उद्देशाने राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या आंबा महोत्सवाची सांगता झाली असून, दोन महिन्यांच्या महोत्सवात १५ कोटी ५० लाखांची उलाढाल झाल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.



कदम म्हणाले की, आंबा हंगाम सुरू झाला की पुण्यातील ग्राहक महोत्सवाची वाट पाहत असतो. या वर्षी १ एप्रिलपासून महोत्सवाला प्रारंभ झाला. महोत्सवात ७० स्टॉल उभारण्यात आले होते. यापैकी १० स्टॉल जिल्हा परिषदेच्या महिला बचत गटांना देण्यात आले होते. आंबा महोत्सवामध्ये रत्नागिरी आणि देवगड येथून १११ आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. तर, सोलापूर जिल्ह्यातील केसर आंबा उत्पादक शेतकरीदेखील होते. या महोत्सवात प्रामुख्याने कोकणातील हापूस आंब्यासह पायरी, बिटकी (लहान हापूस) प्रामुख्याने विक्री झाली. या वर्षी सुमारे अडीच लाख डझन आंब्याची विक्री झाली. यातून सुमारे १५ कोटी ५० लाखांची उलाढाल झाली. गेल्या २३ वर्षांपासून पणन मंडळाच्या वतीने आंबा महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. या आंबा महोत्सवामुळे शेतकरी आणि ग्राहकांमध्ये ऋणानुबंध निर्माण झाले असून, शेतकऱ्यांना हक्काचा ग्राहक मिळाला आहे. यामुळे पणन मंडळाचा आंबा महोत्सव ब्रॅण्ड झाल्याचे पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी सांगितले.

हंगामाच्या सुरुवातीला रत्नागिरी हापूसला ७०० ते ११००, तर देवगडला ५०० ते १ हजार रुपये दर राहिला. हेच दर हंगामाच्या शेवटी ४०० ते ६०० आणि ५०० ते ८०० रुपये राहिले, असे महोत्सवाचे समन्वयक आणि देशांतर्गत व्यापार आणि विकास विभागाचे सहायक उपसरव्यवस्थापक मंगेश कदम यांनी सांगितले.

स्मार्ट पुणे आवृत्ती
12 जून 2024 पृष्ठ क्रमांक 04
द्वारा समर्थित: erelego.com

Agrowon, Dt. 10/06/2024

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात १५ कोटींची उलाढाल

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : कोकणातील हापूस आंबा उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचा ग्राहक मिळावा आणि ग्राहकांना कोकणातील अस्सल हापूस उपलब्ध व्हावा, या उद्देशाने राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या आंबा महोत्सवाची सांगता झाली असून, दोन महिन्यांच्या महोत्सवाची १५ कोटी ५० लाखांची उलाढाल झाल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

कदम म्हणाले, ''आंबा हंगाम सुरू झाला, की पुण्यातील ग्राहक महोत्सवाची वाट पाहत असतो. या वर्षी १ एप्रिलपासून महोत्सवाला प्रारंभ झाला. महोत्सवात ७० स्टॉल उभारण्यात आले होते. यापैकी १० स्टॉल जिल्हा परिषदेच्या महिला बचत गटांना देण्यात आले होते. आंबा महोत्सवामध्ये रत्नागिरी आणि देवगड येथून १११ आंबा उत्पादक शेतकरी सहभागी झाले होते. तर सोलापूर जिल्ह्यातील केसर आंबा उत्पादक शेतकरीदेखील होते. या महोत्सवात प्रामुख्याने कोकणातील हापूस आंब्यासह पायरी, बिटकी (लहान हापूस) प्रामुख्याने विक्री झाली. या वर्षी सुमारे अडीच लाख डझन आंब्याची विक्री झाली. यातून सुमारे १५ कोटी ५० लाखांची उलाढाल झाली.''

**आंबा महोत्सव पणनचा ब्रॅण्ड**

गेल्या २३ वर्षांपासून पणन मंडळाच्या वतीने आंबा महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. या आंबा महोत्सवामुळे शेतकरी आणि ग्राहकांमध्ये ऋणानुबंध निर्माण झाले असून, शेतकऱ्यांना हक्काचा ग्राहक मिळाला आहे. यामुळे पणन मंडळाचा आंबा महोत्सव ब्रॅण्ड झाल्याचे पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी सांगितले.

## ...असे राहिले दर

हंगामाच्या प्रारंभाला रत्नागिरी हापूसला ७०० ते ११००, तर देवगडला ५०० ते १ हजार रुपये दर राहिला. हेच दर हंगामाच्या शेवटी ४०० ते ६०० आणि ५०० ते ८०० रुपये राहिले, असे महोत्सवाचे समन्वयक आणि देशांतर्गत व्यापार आणि विकास विभागाचे सहायक उपसरव्यवस्थापक मंगशे कदम यांनी सांगितले.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# ‘पणन’च्या सुविधांमधून २ हजार ६०७ टन आंबा निर्यात

## विकसित देशांना ४३ कोटी ४६ लाख रुपयांची आंबा निर्यात पूर्ण

पुढारी वॉच

किशोर बरकाले
पुढारी प्रतिनिधी

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या मुंबईतील वाशी येथील तीन आणि बारामती (जि. पुणे) येथील एका निर्यात सुविधा केंद्रांवरून यंदाच्या हंगामात विकसित देशांना आंब्यांची सुमारे २ हजार ६०७ टनांइतकी निर्यात पूर्ण झालेली आहे. निर्यात झालेल्या या आंब्यांची किंमत सुमारे ४३ कोटी ४६ लाख ७२ हजार रुपये आहे. त्यामध्ये कोकणातील हापूस, मराठवाड्यातील केशर आणि कर्नाटकातील बैगनपल्ली या आंब्यांचा समावेश आहे.

गतवर्षी पणन मंडळाच्या निर्यात सुविधांच्या वापरातून हंगामअखेर २ हजार २०० टन आंबा निर्यात झाली होती. त्यांची किंमत सुमारे ३६ कोटी रुपये होती. यंदा ४०७ टन आंबा निर्यात अधिक होऊन उलाढालही वाढली आहे. तसेच जून महिनाअखेर आंबा निर्यात सुरू राहणार असल्याने यंदा उच्चांकी आंबा निर्यात होण्याची अपेक्षा वर्तविण्यात आली.

पणन मंडळाने केंद्र सरकारच्या अपेडा संस्थेच्या मार्गदर्शनाखाली वाशी येथे विकिरण सुविधा, व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधा आणि हॉट वॉटर ट्रीटमेंट तथा उष्णजल प्रक्रिया सुविधा केंद्रांचा समावेश आहे. बारामती येथील निर्यात सुविधा केंद्राचाही वापर झाला. आयातदार देशांना आवश्यक असलेल्या प्रक्रिया करून संबंधित शेतमाल निर्यात करण्याची सुविधा येथे उपलब्ध आहे. नियमांची काटेकोर अंमलबजावणी करीत आणि सर्व प्रक्रिया पार पाडून होणाऱ्या आंबा निर्यातीमुळे माल नाकारण्याचे प्रमाण यंदा नसल्याची माहिती पणन मंडळाकडून देण्यात आली.


सुविधा केंद्रामध्ये निर्यातीपूर्वी होणारी तपासणी व अद्ययावत पॅकिंग.

### इतर देशांना २५ हजार टन आंबा निर्यात अपेक्षित

राज्यांतून विकसित देशांशिवाय इतर देशांमध्ये प्रामुख्याने दुबई, सौदी अरेबिया, कुवेत, बांग्लादेश येथे आंब्यांवर कोणतीही प्रक्रिया न करता आंबा निर्यात होते. गतवर्षी देशांतून २० हजार टन आंबा निर्यातीपैकी महाराष्ट्राचा वाटा १८ हजार टनांइतका होता. यंदा देशातून २५ हजार टन आंब्यांची निर्यात इतर देशांना होण्याची अपेक्षा वर्तविण्यात आली.

**पणन मंडळाची सुविधा केंद्रांच्या वापरातून झालेली आंबा निर्यात**

| क्र. | आंबा | निर्यात टनात | मूल्य-लाखात |
|---|---|---|---|
| १. | **विकिरण सुविधा :** अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, दक्षिण अफ्रिका | ८७९.९६ | १५७७.३९ |
| २. | **व्हेपर हीट ट्रीटमेंट :** इंग्लंड, युरोपियन युनियन देश | १४०९.४६ | २१५३.२७ |
| ३. | **हॉट वॉटर ट्रीटमेंट :** जपान, न्यूझिलंड, दक्षिण कोरिया, युरोपियन युनियन देश | १४७.९६ | २४६.५६ |
| ४. | **निर्यात सुविधा केंद्र, बारामती** इंग्लंड, युरोपियन युनियन देश | १७० | ३६९.५० |
| | एकूण | २६०७.२८ | ४३४६.७२ |

“ पणनच्या केंद्रांच्या वापरातून निर्यातदारांना चांगल्या सुविधेतून गतवर्षी आंबा निर्यातीत ४२, तर यंदा ५६ निर्यातदारांनी सहभाग घेतला. पणन मंडळाच्या निर्यात प्रशिक्षणाचा लाभ घेऊन नवे शेतमाल निर्यातदार तयार होत आहेत. त्यातून आंबा निर्यातदारांची संख्या वाढून शेतकऱ्यांना फायदा होत आहे. आंब्यांच्या गुणवत्तापूर्ण मालामुळेही निर्यात वाढीस मदत झाली शिवाय विमान मार्गाच्या वाहतूक दरात वाढ होऊनही भारतीय आंब्यांना असलेल्या मागणीमुळे निर्यात वाढीस फायदा झाला.

- **संजय कदम,** कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ, पुणे

Pudhari Dt.07/6/2024

# बाजार निरीक्षणासाठी लवकरच भरारी पथके

**पणन संचालक विकास रसाळ यांची माहिती**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारने नेमलेल्या खासगी बाजारांच्या अभ्यास गटाच्या अहवालातील निरीक्षणे व त्यातील शिफारशींवर टास्क फोर्स नियुक्त करण्याचा विचार आहे. खासगी बाजारांनी पणन कायदा, नियम व परवान्यातील अटी व शर्तीचे पूर्ण पालन करणे असून अभ्यास गटाने सुचविल्यानुसार यापुढे खासगी बाजारांच्या कामकाजाच्या निरीक्षणासाठी भरारी पथके लवकरच कार्यान्वित केली जातील, अशी माहिती राज्याचे पणन संचालक विकास रसाळ यांनी दिली.

**अभ्यास गटांच्या शिफारशींवर टास्क फोर्सचा विचार**

राज्यातील कार्यरत खासगी बाजारांची एकदिवशीय कार्यशाळा यशदा येथे गुरुवारी (दि.६) दिवसभर रसाळ यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्या वेळी ते अध्यक्षपदावरून बोलत होते. व्यासपीठावर राज्याचे माजी पणन संचालक व खासगी बाजार अभ्यास गटाचे सदस्य सुनील पवार, खासगी बाजार संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भामरे, पणन उपसंचालक अलका पवार आदी उपस्थित होते. राज्यातील बहुतांश खासगी बाजारांचे ७९ प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यशाळेची सुरुवात झाली. राज्यात सन २००५ पासून झालेल्या बाजार सुधारणा व त्यानंतर स्थापन झालेले खासगी बाजार, त्यांचे कामकाज आणि खासगी बाजारांची वार्षिक क्रमवारीबाबत आढावा घेणे व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ही कार्यशाळा महत्त्वाची होती.

या वेळी बोलताना सुनील पवार यांनी राज्यात पणन सुधारणा लागू करताना तत्कालीन मंत्री गटाची काय भूमिका होती याविषयी प्रथम मांडणी केली. जास्तीत जास्त व्यापारी-खरेदीदारांचा सहभाग शेतमालाच्या लिलावात न झाल्याने स्पर्धात्मक किंमत मिळण्याची शक्यता कमी होते. बऱ्याच खासगी बाजारांमध्ये शेतकरी-भवन, स्वच्छतागृहासारख्या मूलभूत सुविधांचाही अभाव दिसून आला. त्यानंतर त्यांनी राज्य शासनास खासगी बाजारांची स्थापना, त्यांच्या कामकाजाबाबत केलेल्या शिफारशी उपस्थित प्रतिनिधींसमोर मांडल्या.



**खासगी बाजारांच्या कार्यशाळेत सुनील पवार (डावीकडील) यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना पणन संचालक विकास रसाळ.**

दरम्यान, पणन उपसंचालक अलका पवार यांनी खासगी बाजारांच्या वार्षिक माहिती व मासिक विवरण पत्रांबाबत आढावा घेत उपस्थितांचे आभार मानले.

Pudhari, Dt. 04/06/2024

# 'पणन'च्या आंबा महोत्सवात साडेपंधरा कोटींची उलाढाल

## कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती : थेट शेतकऱ्यांकडून २ लाख ४० हजार डझनांची विक्री

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत गेली दोन महिने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजने अंतर्गत झालेल्या महोत्सवात सुमारे २ लाख ४० हजार डझनाइतक्या आंब्यांची शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांना विक्री करण्यात आली. त्यातून तब्बल १५ कोटी ५० लाख रुपयांची उलाढाल झाली असून आंबा महोत्सवाची यशस्वी सांगता झाल्याची माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.



चालू वर्षी मार्केट यार्डातील पुणे जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत दिनांक १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत आंबा महोत्सव संपन्न झाला. रत्नागिरी, सिंधुदुर्गमधील हापूस उत्पादक तर सोलापूर जिल्ह्यातील केशर आंबा उत्पादक असे सुमारे १११ आंबा उत्पादकांसाठी ६० स्टॉल्समध्ये हापूस, केशर, पायरी व बिटकी (लहान हापूस आंबा) आंबा विक्री करण्यात आला. तसेच, जिल्हा परिषदेच्या महिला बचत गटांच्या १० स्टॉल्सवर बचत गटांकडून उत्पादित तांदूळ व नाचणीचे पापड, सांडगे, इंद्रायणी तांदूळ, विविध प्रकारच्या शेवया, लोणची असे घरगुती बनविलेली उत्पादने विक्री करण्यात आली.

मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत आंबा आवक चालू राहिली. रत्नागिरी व देवगड भागातील आंब्याचे दर साधारणपणे वजन व दर्जानुसार ७०० ते ११०० रुपये आणि ५०० ते १००० रुपये प्रतिडझन या दरम्यान राहिले. हंगामाच्या शेवटी साधारणपणे देवगड ५०० ते ८०० रुपये व रत्नागिरी हापूसचे दर ४०० ते ६०० रुपये असे दर राहिले. गतवर्षीपेक्षा या वेळेस सर्वसाधारणपणे प्रतिडझन १०० ते १५० रुपयांनी दर कमी होते.

### प्रतिसादाबद्दल पुणेकरांचे आभार

आंबा विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा माल मिळण्यासाठी पणन मंडळाकडून २००२ पासून हा उपक्रम राबविण्यात येतो. यंदाच्या महोत्सवाला चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल कदम यांनी पुणेकर ग्राहकांचे आभार मानले आहेत. दरम्यान, पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली महोत्सवाचे कामकाज करण्यात आले. तर दैनंदिन समन्वय देशांतर्गत व्यापार विभागाचे प्रमुख मंगेश कदम, उमाकांत वाघ व आनंद शुक्ल या अधिकाऱ्यांनी केले.